॥ येऊ कशी तशी मी नांदायला ॥

गायिकाः रोशन सातारकर

नेहमीच राया तुमची घाई
नका लावू गठुडें बांधायला।
येउ कशी तशी मी नांदायलाहो?
येऊ कशी तशी मी नांदायला ॥ धृ. ॥

सण वर्षाचा आहे दिवाळी
आज राहू जाउ उद्या सकाळी।
जेवन करते पुर्नाची पोळी
भात मी घतलाय रांधायला ॥ १ ॥

गाव हाय अपलं बारा कोस
डोकं तुमचं असं हो कसं?
उन्हातान्हात चालन्याचा त्रास
दिल्याति चपला बांधायला ॥ २ ॥

बाबा गेले हो परगावा
निरोप त्यांचा घ्यायाला हवा।
नाही विचारलं थोरल्या भावा
आई गेली पानी शेंदायला ॥ ३ ॥

तुम्हाला सजना सांगते ऐका
चालावू नका तुमचा हेका।
तुम्हीच सांगा हे बर हाय का
रावण लागलाय सुंदायला ॥ ४ ॥